# अर्थशास्त्र

## बी.ए. प्रथम वर्ष (सेमिस्टर II)

- डॉ. प्रज्ञा बागडे

## भाटकाचे (खंडाचे) सिद्धांत
## (Theories of Rent)

दैनंदिन व्यवहारात भाटक/खंड या शब्दाचा अर्थ भाडे असा होतो. अर्थशास्त्रात भाटक हा शब्द फक्त भूमीच्या संदर्भातच वापरला जातो. म्हणजे जमीन, घर इत्यादींच्या उपयोगाबद्दल त्यांच्या मालकांना दिला जाणारा मोबदला म्हणजे भाटक होय. अर्थशास्त्रात भाटक म्हणजे भूमीच्या वापराबद्दल भू-स्वामीला दिला जाणारा मोबदला होय.

### भाटकाचा अर्थ

**(Meaning of Rent)**

निरनिराळ्या अर्थशास्त्रज्ञांनी भाटकाच्या वेगवेगळ्या व्याख्या केल्या आहेत. त्यापैकी काही प्रमुख व्याख्या पुढील प्रमाणे

१) **रिकार्डोच्या** मतानुसार, "भूमीच्या मूलभूत व अविनाशी शक्तीच्या वापराबद्दल भूमीच्या एकूण उत्पादनापैकी भू-स्वामीला द्यावयाचा हिस्सा म्हणजे भाटक होय."

"Rent is that portion of the produce of the earth which is paid to the landlord for use of the original and idestructible power of the soil." – **Ricardo.**

२) **प्रा. सीनीयर** यांच्या मते, "कोणत्याही निसर्गदत्त साधनाच्या उपयोगापासून मिळणाऱ्या अतिरिक्त उत्पन्नाला भाटक असे म्हणतात."

"Rent is surplus arising from the use of an appropriated natural agent."

३) **मार्शल** यांच्या मते, "भूमी व अन्य निसर्गदत्त देणगीच्या मालकीपासून मिळणारे उत्पन्न म्हणजे भाटक होय."

"The income derived from the ownership of land and other free gift of nature is called rent." - **Marshall**

४) **कार्व्हर** यांच्या मते, "भूमीच्या उपयोगाबद्दल भूमी मालकाला दिली जाणारी किंमत म्हणजे भाटक होय."

"Rent is the price paid to the landlord for use of land" - **Carver**

वरील व्याख्यांवरुन भाटकाची पुढील वैशिष्ट्ये सांगता येतील.

१) भाटक हे भूमीच्या वापराबद्दलचा मोबदला होय.

२) भाटक हे भू-स्वामीला प्राप्त होतो.

३) भाटक हे भूमीच्या मूलभूत व अविनाशी गुणांमुळे भाटकाची निर्मिती होते.

४) भाटक हे आधिक्य स्वरुपाचे असून ते भूमीच्या एकूण उत्पन्नाचा एक भाग होय.

## भाटकाचे प्रकार

**(Types of Rent)**

### १) मिश्र किंवा सकल भाटक

भूमीतून मिळणाऱ्या उत्पादनाच्या किमतीतून प्रत्यक्ष करण्यात आलेला लागवडीचा खर्च वजा केल्यानंतर शिल्लक राहणारी रक्कम म्हणजे मिश्र भाटक (खंड) होय.

सकल भाटक = एकूण उत्पादन - एकूण व्यय

### २) शुध्द किंवा आर्थिक भाटक

भूमीच्या मूलभूत व अविनाशी गुणांच्या वापराबद्दल भू-स्वामीला जे उत्पन्न मिळते ते आर्थिक व शुध्द भाटक होय. आर्थिक भाटक हे सकल भाटकात समाविष्ट असते.

### ३) प्रसंविदा किंवा करारी भाटक

"जमिनीचा मालक व त्याची जमीन वाहणारा कास्तकार (कूळ) यांच्यात करार होऊन जो खंड ठरतो त्याला प्रसंविदा भाटक म्हणतात. हा भाटक जमीन मालक व कुळ यांच्यातील परस्पर करारातून निश्चित होतो. प्रसंविदा भाटक हा मिश्र खंड असतो. प्रसंविदा भाटकाची रक्कम ही जमीनदार व कूळ यांच्या सौदाशक्तीवर अवलंबून असते.

## रिकार्डो भाटक सिद्धांत

**(Recordian Theory of Rent)**

इंग्लंडमधील अर्थशास्त्रज्ञ डेव्हिड रिकार्डो यांनी १९व्या शतकात आपल्या "Principle of political Economy" या ग्रंथात भाटकाच्या सिद्धांताचे विस्तृत विवेचन केले. रिकार्डो हे परंपरागत संप्रदायातील एक प्रमुख विचारवंत असल्यामुळे रिकार्डोचा खंड सिद्धांत परंपरागत सिद्धांत म्हणूनही ओळखला जातो.

## भाटकाची व्याख्या

**रिकार्डो** यांनी भाटकाची व्याख्या पुढीलप्रमाणे मांडली.

"भूमीच्या मूलभूत व अविनाशी गुणांचा वापर केल्याबद्दल भूमीच्या एकूण उत्पादनापैकी जो भाग भूमी मालकाला दिला जातो त्याला भाटक असे म्हणतात."

"Rent is that portion of produce of the earth which is paid to the landlord for the use of the original and indestructible power of the soil." - **Recordo**

प्रा. रिकार्डो यांच्या वरील व्याख्येवरुन भाटकाची पुढील वैशिष्ट्ये स्पष्ट होतात.

१) भाटक केवळ भूमीलाच मिळते.

२) भाटक हे आधिक्य स्वरुपाचे असते.

३) भूमीतील नैसर्गिक आणि अविनाशी स्वरुपाच्या मूलभूत घटक द्रव्यांमुळेच भूमीला भाटक मिळते.

भूमीच्या पुढील तीन वैशिष्ट्यांमुळे भाटक निर्माण होते.

१) भूमीतील गुण भिन्नता व स्थिती भिन्नता

२) भूमीच्या मर्यादित पुरवठ्यामुळे भाटकाची निर्मिती होते.

३) भूमीला आऱ्हासी उत्पत्ती नियम लागू होत असल्यामुळे भाटकाची निर्मिती होते.

## सिद्धांताची गृहिते

१) भूमीचा पुरवठा मर्यादित असतो.

२) भाटक केवळ भूमीलाच मिळते.

३) भूमी ही गुणदृष्ट्या भिन्न असते.

४) भूमीमध्ये मूलभूत व अविनाशी गुण असतात.

५) लोकसंख्येत एकसारखी वाढ होत जाते.

६) जमीनीची लागवड सुपीकतेनुसार केली जाते.

७) शेतीमध्ये आऱ्हासी उत्पत्ती नियम लागू होतो.

८) सीमांत जमीन अस्तित्वात असते.

९) हा सिद्धांत दीर्घकाळावर आधारित आहे.

१०) जमीनीच्या सुपीकतेतील गुणभिन्नतेमुळे भाटकाची निर्मिती होते.

## सिद्धांताचे स्पष्टीकरण

उत्पादनाच्या प्रक्रियेत भूमीचा विस्तृत आणि सखोल अशा दोन्ही प्रकारच्या लागवडीसाठी उपयोग केला जातो. त्यामुळे या दोन्ही प्रकारच्या लागवडीत भाटकाची निर्मिती होते.

## विस्तृत लागवडीत भाटक निर्मिती

**(Rent Creation in Extensive Cultivation)**

भूमी ही गुणदृष्ट्या भिन्न असते या भूमीच्या वैशिष्ट्यावर विस्तृत लागवडीत खंड आधारीत आहे.

"विशिष्ट परिस्थितीमध्ये समान क्षेत्रफळाच्या परंतु गुणांमध्ये व स्थितीमध्ये वेगळेपणा असणाऱ्या जमिनीच्या तुकडयांवर श्रम भांडवलाच्या समान मात्रा उपयोगात आणून लागवड केल्यास उत्कृष्ट प्रकारच्या भूमीच्या तुकडयापासून कनिष्ठ भूमीच्या तुकडयावरील उत्पादनापेक्षा जे जास्तीचे उत्पादन होते त्याला भाटक असे म्हणतात."

समजा एखाद्या प्रदेशात सुपीक, मध्यम व कनिष्ठ अशा तीनही प्रकारच्या जमीनी आहेत. सर्वप्रथम सुपीक जमीन लागवडीखाली आणली जाते. परंतु जसजशी लोकसख्ंया वाढत गेली त्यावेळी सुपीक जमीनीला धान्य कमी पडू लागले. त्यामुळे मध्यम प्रतीची जमीन लागवडीखाली आणल्यामुळे सुपीक जमीनवर जे तंत्र वापरले होते तेच तंत्र व तेवढाच खर्च मध्यम प्रतीच्या जमीनीवर केला. परंतु मध्यम प्रतीच्या जमीनीपासून येणारे उत्पादन कमी राहील.

लोकसंख्येत सातत्याने वाढ होत गेल्यामुळे वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याची मागणी वाढेल व ही वाढती अन्नधान्याची मागणी पूर्ण करण्यासाठी कनिष्ठ प्रतीची जमीन लागवडीखाली आणली जाईल. कनिष्ठ प्रतीच्या जमीनीवर देखील सारखेच तंत्र व सारखाच खर्च केला तरी कनिष्ठ प्रतीच्या जमीनीपासून येणारे उत्पादन सुपीक व मध्यम प्रतीच्या जमीनीपेक्षा कमी राहील त्यामुळे सरासरी व्ययात वाढ होईल.


अन्नधान्याची किंमत = सरासरी व्यय होईल. हीच किंमत सुपीक व मध्यम प्रतीच्या जमिनीतून मिळणाऱ्या उत्पादनाला सुध्दा मिळेल. परंतु सुपीक व मध्यम प्रतीच्या

| जमिनीचा प्रकार | उत्पादन खर्च (रुपयात) | उत्पादन (क्विंटलमध्ये) | प्रति क्विंटल किंमत | एकूण उत्पन्न | खंड (रुपयात) |
|---|---|---|---|---|---|
| अ- सुपीक | ६००० | ६० | ३०० | १८,००० (३००x ६०) | १२,००० |
| ब- मध्यम | ६००० | ४० | ३०० | १२,००० (३००x ४०) | ६,००० |
| क- कनिष्ठ | ६००० | २० | ३०० | ६,००० (३००x २०) | ०० |

जमीनीपासून मिळालेले उत्पादन हे जास्त असल्यामुळे या जमीनीपासून मिळालेले उत्पन्न हे खर्चापेक्षा जास्त असल्यामुळे हे जास्त उत्पन्न म्हणजेच आधिक्य होय व हे आधिक्य म्हणजेच खंड होय.

पुढील उदाहरणाच्या सहाय्याने विस्तृत लागवडीत भाटकाची निर्मिती स्पष्ट करता येते.

वरील उदाहरणात 'क' जमिनीचे उत्पन्न व खर्च समान आहे. ती सीमांत भूमी होय. या सीमांत भूमीपासून खंड मिळत नाही. म्हणून या जमिनीला बिनखंडी भूमी असे म्हणतात. 'अ' या जमिनीपासून १२,००० रु. व 'ब' या जमिनीपासून ६००० रु. खंड मिळतो. 'अ' व 'ब' या सीमांतपूर्व जमीनी आहे. हेच उदाहरण पुढील आकृतीच्याद्वारे स्पष्ट करता येते.




वरील आकृतीत 'अक्ष' आसावर जमिनीची प्रत व 'अय' आसावर उत्पादन व लागवडीचा खर्च दर्शविला आहे. 'क' जमीन ही कनिष्ठ प्रकारची जमीन आहे. 'अ' जमिनीपासून १२,०००रु. खंड मिळतो. 'ब' जमिनीपासून ६,०००रु. खंड मिळतो. रेखांकित केलेले भाग खंड दर्शवितात.

## सखोल लागवडीत भाटक निर्मिती

### (Rent Creatio in Intensive Cultivation)

भूमीचा पुरवठा मर्यादित असल्यामुळे शेतकरी सखोल लागवडीच्या पध्दतीचा उपयोग करतो. कारण लोकसंख्या सतत वाढत असेल तर या वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी जमिनीच्या एकाच तुकडयावर श्रम भांडवलाच्या जास्तीत जास्त मात्रा उपयोगात आणून उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न करतो. यालाच सखोल लागवड

असे म्हणतात. या पध्दतीचा वापर जेव्हा देशातील सर्व जमिन लागवडी खाली आणल्यानंतर वाढती अन्नधान्याची मागणी पूर्ण करण्यासाठी केला जातो.


विशिष्ट परिस्थितीत जमिनीच्या विशिष्ट क्षेत्रफळात एकापेक्षा जास्त श्रम भांडवलाच्या समान मात्रा उपयोगात आणून उत्पादन घेतल्यास सीमांपूर्व मात्रेपासून सीमांत मात्रेपेक्षा होणाऱ्या जास्तीच्या उत्पादनाला 'भाटक' असे म्हणतात.

शेतीमध्ये आऱ्हासी उत्पत्ती नियम लागू होत असल्यामुळे श्रम भांडवलाच्या नंतरच्या मात्रेची सीमांत उत्पत्ती ऱ्हास पावते. श्रम भांडवलाच्या शेवटच्या मात्रेपासून खंड मिळत नाही. कारण या मात्रेपासून मिळणारे उत्पादन व खर्च समान असतो. सीमापूर्ण मात्रेपासून खंड मिळतो.

सखोल लागवडीत खंडाचे पुढील उदाहरणाद्वारे स्पष्टीकरण करता येते.

| श्रम भांडवलाच्या मात्रा | उत्पादन खर्च (रुपयात) | उत्पादन (क्विंटलमध्ये) | प्रति क्विंटल किंमत | एकूण उत्पन्न (रुपयात) | खंड (रुपयात) |
|---|---|---|---|---|---|
| पहिली मात्रा | ६,००० | ६० | ३०० | १८,००० (३००x ६०) | १२,००० |
| दुसरी मात्रा | ६,००० | ४० | ३०० | १२,००० (३००x ४०) | ६,००० |
| तिसरी मात्रा | ६,००० | २० | ३०० | ६,००० (३००x २०) | ०० |

वरील उदाहरणात आऱ्हासी उत्पत्ती नियमानुसार पुढील प्रत्येक मात्रेपासून मिळणारे उत्पादन कमी कमी होत जाते. पहिल्या मात्रेपासून १२,००० रु., दुसऱ्या मात्रेपासून ६,००० रु. खंड मिळतो. तिसऱ्या मात्रेपासून खंड मिळत नाही ही सीमांत मात्रा होय.




वरील आकृतीत 'अक्ष' आसावर श्रम भांडवलाच्या मात्रा व 'अय' आसावर उत्पादन व खर्च घेतला आहे. पहिल्या श्रम भांडवलाच्या मात्रेपासून १८,००० रुपयाचे एकूण उत्पादन होते. त्यातून ६,००० रुपये उत्पादन खर्च वजा करता १२,००० रु. खंड मिळतो.

दुसऱ्या मात्रेपासून १२,००० रु. चे उत्पादन होते. त्यातून ६,००० रु. उत्पादन खर्च वजा करता ६,००० रु. खंड मिळतो.

तिसऱ्या मात्रेचे ६,००० रु. चे उत्पादन व ६,००० रुपये उत्पादन खर्च, दोन्ही समान असल्यामुळे तिसऱ्या मात्रेपासून खंड मिळत नाही.

## सिध्दांतावरील टीका

**(Criticism)**

### १) भूमीमध्ये उपजत व अविनाशी गुण नाही.

भूमीमध्ये उपजत व अविनाशी गुण असतात असे रिकार्डो यांचे म्हणणे आहे. परंतु टीकाकारांच्या मते हे म्हणणे योग्य नाही. कारण जमिनीवर कुठलीही सुधारणा न करता वर्षानुवर्ष सतत फक्त लागवड केल्यास त्या जमिनीचा कस कमी होत जातो. त्यामुळे भूमीध्ये उपजत व अविनाशी शक्ती असते असे म्हणणे बरोबर नाही.

### २) खंड फक्त भूमीलाच मिळत नाही

रिकार्डो यांच्या मते खंड फक्त भूमीलाच मिळतो. ज्या घटकांची मागणी जास्त व त्यामानाने पुरवठा दुर्मिळ असतो अशा सर्वच घटकांना खंड मिळतो.

### ३) प्रथम सुपीक जमिनीवर लागवड केली जात नाही.

रिकार्डो यांच्या मते लागवड करतांना प्रथम सुपीक जमिनीवर लागवड केली जाते. त्यानंतर मध्यम प्रतीच्या जमिनीवर लागवड केली जाते व शेवटी कनिष्ठ प्रतीच्या जमिनीवर लागवड केली जाते. असा लागवडीचा क्रम रिकार्डो यांनी निश्चित केला.

परंतु सर्वेक्षणात असे दिसून आले की जमिनीच्या सुपीकतेपेक्षा ज्या जमिनीवर लागवड करणे सोयीचे असते त्या जमिनीवर प्रथम लागवड केली जाते.

### ४) पूर्ण स्पर्धेचे गृहीत चुकीचे

रिकार्डो यांचा खंड सिद्धांत पूर्ण स्पर्धेच्या गृहीतावर आधारित आहे. परंतु प्रत्यक्षात पूर्ण स्पर्धा कधीच अस्तित्वात नसते. सर्वत्र अपूर्ण स्पर्धाच अस्तित्वात असते.

### ५) दीर्घकाळाचे गृहीत अयोग्य

रिकार्डो यांनी खंड सिद्धांतात दीर्घकाळ गृहीत धरला आहे. परंतु खंड हा अल्पकाळात सुध्दा मिळतो.

### ६) अन्य उपयोगाचा विचार नाही

रिकार्डो यांनी भूमीचा उपयोग केवळ शेतीक्षेत्रासाठीच होतो असे गृहीत धरले आहे. परंतु प्रत्यक्षात भूमीचा उपयोग उद्योग-व्यवसाय, घरबांधणी, इत्यादींसाठी देखील होतो. शेती क्षेत्रातील बिनखंडी भूमी इतर उद्योग व्यवसायासाठी फायदेशीर ठरु शकते. परंतु रिकार्डो यांनी भूमीच्या इतर उपयोगाचा विचार केला नाही.

### ७) खंडाचा किमतीवर परिणाम होतो.

खंडाचा किमतीवर परिणाम होत नाही असे रिकार्डो यांचे मत होते. परंतु आधुनिक अर्थशास्त्रज्ञांच्या मते खंडाचा उत्पादन खर्चात समावेश असल्यामुळे तो उत्पादन खर्चाचा एक भाग असल्यामुळे खंडाचा किमतीवर परिणाम होतो.

### ८) सीमांत भूमीची कल्पना चुकीची

रिकार्डो यांच्या मते सीमांत भूमी अस्तित्वात असते व या सीमांत भूमीला खंड मिळत नाही. परंतु टीकाकारांच्या मते सीमांत भूमी अस्तित्वात नसते कारण लोकसंख्येत प्रचंड प्रमाणात वाढ होत असल्यामुळे अन्नधान्याच्या मागणीतही सतत वाढ होत आहे. त्यामुळे कनिष्ठ प्रतीच्या जमिनीलाही खंड मिळतो.

## भाटकाचा आधुनिक सिद्धांत

**(Modern Theory of Rent)**

श्रीमती जोन रॉबिन्सन, प्रा. बोल्डिंग, प्रा. बेनहॅम, डॉ. मार्शल इत्यादी अर्थशास्त्रज्ञांनी आधुनिक खंड सिध्दांताची मांडणी केली. रिकार्डोच्या मते खंड केवळ भूमीलाच मिळतो इतर घटकांना नाही. रिकार्डोचा मते खंडाची निर्मिती दोन कारणांमुळे होते एक भूमीची गुणभिन्नता व दुसरे भूमीचा मर्यादित पुरवठा. परंतु आधुनिक अर्थशास्त्रज्ञांना रिकार्डोचे हे मत मान्य नव्हते. आधुनिक अर्थशास्त्रज्ञांच्या मते भूमीला खंड हा भूमीच्या दुर्मिळतेमुळे मिळतो. गुणभिन्नतेमुळे नाही. खंड हा उत्पादन साधनाच्या दुर्मिळतेमुळे मिळतो. उत्पादनाच्या कोणत्याही साधनाचा पुरवठा हा जेव्हा मागणीच्या मानाने कमी पडतो अशावेळी त्या साधनाच्या किमतीत वाढ होऊन त्याला जास्तीचे उत्पन्न मिळू लागते. दुर्मिळतेमुळे भूमीला जसा जास्तीचा मोबदला मिळतो तसा तो इतर साधनांनाही मिळतो. त्यामुळे भाटकाची निर्मिती भूमीप्रमाणेच उत्पादनाच्या इतर घटकांमध्येही होऊ शकते. याच विचारातून आधुनिक अर्थशास्त्रज्ञांनी भाटकाच्या नवीन सिद्धांताची मांडणी केली.

## भाटकाची व्याख्या

१) **प्रा. बेनहॅमच्या** मते, “मर्यादित व स्थिर पुरवठा असलेल्या कोणत्याही विशेषोपयुक्त साधनापासून जे आधिक्य स्वरुपाचे उत्पन्न मिळते ते आर्थिक दृष्ट्या भाटक होय.”

“The rent in Economic sense can be defined as a surplus accruing to a specific factor the supply of which is fixed.” - **Benham**

२) **श्रीमती जोन रॉबिन्सन** यांच्या मते, “उत्पादनाच्या विशिष्ट घटकाला कार्यप्रवृत्त करण्यासाठी अपेक्षित न्युनतम मोबदल्यापेक्षा जे जास्तीचे उत्पन्न मिळते त्याला भाटक असे म्हणतात.”

“The essence of the conception of the surplus earned by a particular part of a factor of production over and above the minimum earning necessary to induce to do its work.” – **Mrs Joan Robinson.**

वरील व्याख्यांवरुन भाटकाची पुढील वैशिष्ट्ये स्पष्ट होता.

### १) विशेषोपयुक्त साधनापासून मिळणारे उत्पन्न

एकाच साधनाचे अनेक उपयोग असतात. परंतु ते साधन एखाद्या कार्यासाठी विशेषोपयुक्त असते अशा साधनास विशेषोपयुक्त साधन म्हणतात. एखादी जमीन एखाद्या विशेष पिकासाठी उपयुक्त असेल तर ती जमीन दुसऱ्या पिकासाठी फारशी उपयुक्त ठरणार नाही. भातशेतीसाठी उपयुक्त असणारी जमीन चहाच्या मळयासाठी तितकीशी उपयुक्त ठरणार नाही. याचप्रमाणे इतर उत्पादनाच्या साधनांचे देखील अनेक वैकल्पिक उपयोग असतात. जो उपयोग जास्त फायदेशिर असतो त्या उपयोगासाठी त्या साधनाचा वापर केला जातो.

### २) साधनाचा पुरवठा अलवचिक व स्थिर असला पाहिजे

भाटकाची निर्मिती होण्यासाठी उत्पादक साधनाचा पुरवठा अलवाचिक व स्थिर असला पाहिजे. त्यामुळे त्या साधनांच्या मागणीत वाढ झाल्यास किंमतीत वाढ होऊन त्या साधनाला आधिक्य स्वरुपाचे जे उत्पन्न मिळते त्यालाच ‘भाटक’ असे म्हणतात.

अल्पकाळात इतर उत्पादन घटकांचा पुरवठा अलवचिक असल्यास त्या घटकांना देखील भाटक मिळू शकते.

### ३) भाटक हे आधिक्य स्वरुपाचे उत्पन्न होय

भाटक हे आधिक्य स्वरुपाचे उत्पन्न होय. थोडक्यात खंड म्हणजे उत्पादक घटकाच्या प्रत्यक्ष उत्पन्नाचे त्यांच्या बदली उत्पन्नावरील आधिक्य होय. श्रीमती जोन रॉबिन्सनच्या मते, “एखादा उत्पादनाचा घटक एखाद्या विशिष्ट व्यवसायात विशेषोपयुक्त कामावर ठेवण्यासाठी जी किंमत द्यावी लागते. त्याला बदली उत्पन्न किंवा वैकल्पिक व्यय म्हणतात.”

म्हणजेच एखाद्या साधनाचा विशिष्ट कामासाठी उपयोग करावयाचा म्हणजे त्याच्या इतर वैकल्पिक उपयोगापासून त्या साधनाला मिळणाऱ्या उत्पन्नाचा त्याग करावा लागतो.

## भाटकाचे निर्धारण

उत्पादक साधनाचे अनेक उपयोग होत असले तरी प्रत्येक उत्पादनाचे साधन हे सर्वोत्तम उपयोगाकडे जाण्यास तयार असतो. अर्थात त्या साधनाचा सर्वोत्तम उपयोगाकरीता वापर करतांना इतर पर्यायी उपयोगापासून जे उत्पन्न मिळणार असते त्या उत्पन्नाचा त्याग करावा लागतो हा त्याग म्हणजे वैकल्पिक व्यय होय.


उदा. समजा एका मेकॅनिकल इंजिनिअरला एका कंपनीत १०,००० रुपये महिन्याला पगार मिळतो. दुसऱ्या कंपनीत त्याने काम करण्याचे ठरविले तर त्याला ९,०००रुपये आहे. हे त्याचे न्यूनतम उत्पन्न आहे. वर्तमान कंपनीत त्याला एवढे उत्पन्न मिळणे आवश्यक आहे. ९,००० रुपये ही त्याची न्यूनतम पुरवठा किंमत आहे. प्रत्यक्षात वास्तविक उत्पन्न बदली उत्पन्नापेक्षा जास्त आहे.

खंड = प्रत्यक्ष उत्पन्न - बदली उत्पन्न

= १०,००० - ९,००० रु.

खंड = १,००० रुपये

## आकृतीद्वारे स्पष्टीकरण




वरील आकृतीत 'अक्ष' आसावर उत्पादक साधनांच्या मात्रा व 'अय' आसावर मोबदला दर्शविला आहे. उत्पादक घटकांना ज्यावेळी 'अप' इतका मोबदला दिला जाते त्यावेळी त्या मोबदल्यावर एकही घटक काम करण्यास तयार नसतो. मोबदला अप वरुन 'अक' इतका वाढल्यास 'अत' इतकी उत्पादनाची साधने काम करण्यास तयार होतात.

मोबदला 'अक' वरुन 'अक'$_{१}$ इतका केल्यास 'अत'$_{१}$ इतकी उत्पादनाची साधने काम करण्यास तयार होतात. मोबदला अक$_{२}$ केल्यास म्हणजे मोबदल्यात वाढ केल्यास अत$_{२}$ इतकी उत्पादनाची साधने काम करण्यास तयार होतात. 'पप' हा उत्पादक साधनांचा पुरवठा वक्र आहे 'मम' हा उत्पादनाच्या साधनांचा मागणी वक्र आहे. 'पप' हा पुरवठा वक्र 'मम' या मागणी वक्राला 'ज' बिंदूत स्पर्श करतो. या ठिकाणी मागणी व पुरवठ्याचे संतुलन

होऊन अक$_{२}$ हा मोबदला निश्चित होतो. उद्योगातील सर्वच उत्पादन घटकांना समान मोबदला या नुसार अक$_{२}$ पेक्षा ज्या उत्पादन घटकांना कमी मोबदला मिळत होता त्यांना सुध्दा अक$_{२}$ इतका मोबदला मिळेल. हा जास्तीचा मोबदला खंडाप्रमाणे असतो. 'अत$_{२}$' उत्पादन घटकांना पक$_{२}$ज इतका खंड मिळतो. उत्पादन घटकांच्या मागणीत वाढ झाल्यामुळे म$_{१}$ म$_{१}$ हा नवीन मागणी वक्र पप या पुरवठा वक्राला 'र' बिंदूत स्पर्श करतो. या ठिकाणी उत्पादन घटकांना अक$_{३}$ इतका मोबदला निश्चित होतो या मोबदल्यावर काम करण्यास तयार असणाऱ्या उत्पादक साधनांच्या पुरवठ्यात वाढ होऊन तो 'त$_{२}$त$_{३}$' इतका होतो. सर्व उत्पादक साधनांना (अत३) परक३ भटक प्राप्त होते.

थोडक्यात – १) उत्पादनाच्या प्रत्येक घटकांना खंड मिळतो. २) प्रत्यक्ष उत्पन्नातून वैकल्पिक खर्च वजा केल्यास खंड काढता येतो. ३) विशेषोपयुक्त व दुर्मिळ घटकांना खंड मिळतो.

## रिकार्डो व आधुनिक खंड सिद्धांताची तुलना

| रिकार्डोचा खंड सिद्धांत | आधुनिक खंड सिद्धांत |
|---|---|
| १) भाटक केवळ भूमीलाच मिळतो. | १) सर्व उत्पादक घटकांना भाटक मिळतो. |
| २) भाटक गुणभेदजन्यतेमुळे मिळतो | २) भाटक दुर्मिळतेमुळे मिळतो |
| ३) भाटक भूमीच्या उपजत व अविनाशी शक्तीमुळे मिळतो | ३) उत्पादक घटकांच्या विशेषोपयुक्ततेमुळे खंड मिळतो. |
| ४) हा सिद्धांत पूर्ण स्पर्धेवर आधारित आहे. | ४) हा सिद्धांत पूर्ण स्पर्धेवर आधारीत नाही. |
| ५) भाटक हा उत्पादन खर्चाचा घटक नसतो | ५) भाटक हा उत्पादन खर्चाचा घटक असतो |
| ६) भाटकाचा मूल्यामध्ये समावेश करता येत नाही | ६) भूमीच्या भाटकाचा मूल्यामध्ये समावेश करण्यात आले आहे. |

| | |
|---|---|
| ७) किमतीचा खंडावर परिणाम होतो. | ७) खंडाचा किमतीवर परिणाम होतो. |
| ८) भूमीला व्यय नसतो | ८) भूमीला वैकल्पिक व्यय असतो. |
| ९) सीमांत भूमीच्या उत्पन्नावरील आधिक्य म्हणजे खंड. | ९) वैकल्पिक व्ययावरील आधिक्य म्हणजे खंड. |

# अपेक्षित प्रश्न

## दिर्घोत्तरी प्रश्न

१) रिकार्डोच्या खंड सिद्धांताचे टीकात्मक परिक्षण्ण करा.

२) भाटकाचा आधुनिक खंड सिद्धांत स्पष्ट करा.

## लघुत्तरी प्रश्न

१) खंड म्हणजे काय?

२) खंडाचे प्रकार सांगा

३) रिकार्डोच्या खंड सिद्धांताची गृहिते सांगा

४) रिकार्डोचा खंड सिद्धांत व आधुनिक खंड सिद्धांत यांची तुलना करा.

५) रिकार्डोच्या खंड सिद्धांतावरील टीका सांगा.